10 JUN 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'आव्हान २०१७' : लोककलेचे दर्शन अन् प्रबोधनाचा जागर !

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात सुरू असणाऱ्या 'आव्हान २०१७" या आपत्ती व्यवस्थापन शिबिरातील शिबिरार्थींनी शुक्रवारी शहरातून भव्य शोभा यात्रा काढली. यामध्ये विद्यार्थी, विद्यार्थीनी पारंपरिक वेशभूषेमध्ये सहभागी झाले होते. काही विद्यार्थ्यांनी अभिनव पोशाख करून सामाजिक संदेश दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी आपत्ती व्यवस्थापनाची प्रात्यक्षिकेही सादर केली. शिबिराचा शनिवारी समारोप होणार आहे.

शिवाजी विद्यापीठामध्ये १ जून पासून सुरू झालेल्या या शिबिरामध्ये राज्यातील वेगवेगळ्या विद्यापीठामधील विद्यार्थी, विद्यार्थिनी सहभागी झाल्या आहेत. शुक्रवारी या शिबिरार्थींनी शहरातून भव्य शोभा यात्रा काढली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते फ्लॅग-ऑफ करून रॅलीस प्रारंभ करण्यात आला. ढोलताशांच्या गजरात आणि छत्रपती शिवरायांच्या जयघोषात सुरू झालेल्या शोभा यात्रेच्या अग्रस्थानी एनडीआरएफचे आपत्ती व्यवस्थापन सामग्रीने सुसज्ज वाहन होते. त्याबरोबर एनडीआरएफचे जवानही रॅलीच्या पुढे होते. या रॅलीत विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महाराणी ताराराणी, जिजाऊ, तानाजी मालुसरे, संत गाडगेबाबा आदी विविध वेशभूषा केल्या होत्या. त्याचबरोबर पर्यावरण संरक्षण व संवर्धन, स्त्री-भ्रूण हत्याविरोधी बेटी बचाओ अभियान, वृक्षसंवर्धन, महिला सन्मान, ग्लोबल वॉर्मिंग, मतदार जागृती, व्यसनमुक्ती, भ्रष्टाचार, शेतकरी आत्महत्या, लष्करी जवानांचा सन्मान अशा अनेक विषयांबाबत प्रबोधन करणारे फलक घेऊन स्वयंसेवक रॅलीत सहभागी झाले होते. आपापल्या विद्यापीठ परिक्षेत्रातील संस्कृतीचे दर्शन घडविणारे कलाविष्कारही काही संघांनी सादर केले.




१) कोल्हापूर : सिगारेटची अंत्ययात्रा काढून विद्यार्थिनींनी व्यसनमुक्तीचा संदेश दिला. २) शोभा यात्रेमध्ये शिबिरार्थींनी आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवले.






३) व्यसनाधिनतेच्या विरोधात तरुणांनी अभिनव पद्धतीने प्रबोधन केले. ४) शोभायात्रेतील वासुदेवाच्या स्वारीने लक्ष वेधले. ५) बालविवाह, जगण्याचा अधिकार आणि तृतीयपंथींचे प्रश्न यावरही शोभा यात्रेतून प्रबोधन करण्यात आले. ६) पोतराजही शोभायात्रेचे आकर्षण ठरला. .

(छाया : रियाज ट्रेनर)

10 JUN 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रॅलीद्वारे आपत्ती व्यवस्थापनविषयक जनजागृती

## राज्यातील स्वयंसेवकांचा सहभाग; विद्यापीठात 'आव्हान-२०१७' शिबिराचा आज समारोप

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात १ जूनपासून सुरू असलेल्या 'आव्हान-२०१७' या राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिराच्या समारोप कार्यक्रमाच्या पूर्वसंध्येला शिबिरार्थींनी कोल्हापूर शहरातून कल्पक संदेश देत जल्लोषात रॅली काढून नागरिकांत आपत्ती व्यवस्थापनापासून ते लेक वाचवा अभियानापर्यंत विविध सामाजिक विषयांवर जनजागृती केली. जनजागृती रॅली सुरू असताना पावसाचा हलकासा शिडकावा सुरू होता. पावसामुळे विद्यार्थ्यांच्या उत्साहात अधिक भर पडल्याचे दिसत होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'आव्हान-२०१७' या राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिराच्या समारोप कार्यक्रमाच्या पूर्वसंध्येला शिबिरार्थींनी कोल्हापूर शहरातून विविध वेषभूषा करून कल्पक संदेश देत जनजागृती रॅली काढली. यावेळी या रॅलीत सहभागी शिबिरार्थी संघ. (छाया : पप्पू अत्तार)**

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते फ्लॅग-ऑफ करून रॅलीस प्रारंभ करण्यात आला. शुक्रवारी सायंकाळी आपत्ती व्यवस्थापनासह विविध सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात जगजागृतीपर रॅली शहरातून काढण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीपासून प्रारंभ झाल्यानंतर मालती अपार्टमेंट, राजारामपुरी येथील आईचा पुतळा व सायबरमार्गे ही रॅली पुन्हा विद्यापीठ परिसरात आली. यानंतर रॅलीची सांगता करण्यात आली. ढोलताशांच्या गजरात आणि छत्रपती शिवरायांच्या जयघोषात सुरू झालेल्या रॅलीच्या अग्रस्थानी एनडीआरएफचे आपत्ती व्यवस्थापन सामग्रीने सुसज्ज वाहन होते. त्याबरोबर एनडीआरएफचे जवानही रॅलीच्या अग्रणी होते. या रॅलीत विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महाराणी ताराराणी, राजमाता जिजाऊ, तानाजी मालुसरे, संत गाडगेबाबा आदी विविध वेशभूषा केल्या होत्या. त्याचबरोबर पर्यावरण संरक्षण व संवर्धन, स्त्रीभ्रूण हत्याविरोधी बेटी बचाओ अभियान, वृक्षसंवर्धन, महिला सन्मान, ग्लोबल वॉर्मिंग, मतदार जागृती, व्यसनमुक्ती, भ्रष्टाचार, शेतकरी आत्महत्या, लष्करी जवानांचा सन्मान अशा अनेक विषयांबाबत प्रबोधन करणारे फलक घेऊन स्वयंसेवक रॅलीत सहभागी झाले होते. आपापल्या विद्यापीठ परिक्षेत्रातील संस्कृतीचे दर्शन घडविणारे कलाविष्कारही काही संघांनी सादर केले. या रॅलीमुळे 'आव्हान-२०१७' मधील तरुणाईचा उत्साह आणि जल्लोष अगदी टीपेला पोहोचल्याचे दिसून आले.

'आव्हान-२०१७' मध्ये राज्यभरातील चौदा विद्यापीठांतील राष्ट्रीय सेवा योजनेचे सुमारे १२०० स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. १ जूनपासून गेल्या नऊ दिवसांत भूमी, जल आदी ठिकाणी उद्भवणाऱ्या विविध आपत्ती आणि त्यांचे व्यवस्थापन, मदतकार्य, पुनर्वसन आदींविषयी एनडीआरएफच्या जवानांच्या सहकायनि प्रशिक्षण या स्वयंसेवकांना देण्यात आले. या कालावधीतील संपूर्ण प्रशिक्षणावर आधारित लेखी, प्रात्यक्षिक व मौखिक परीक्षाही शुक्रवारी सकाळी घेण्यात आली.

यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. वासंती रासम, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रभारी संचालक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासह राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) एस. डी. इंगळे यांच्यासह एनडीआरएफचे जवान, एनएसएसचे जिल्हा संपर्क अधिकारी, विद्यापीठाचे शिक्षक, अधिकारी, सेवक व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राज्यपालांच्या उपस्थितीत आज समारोप

राज्यपालांच्या उपस्थितीत या दहा दिवसीय शिबिराचा समारोप समारंभ शनिवारी (दि. १० ) सकाळी साडेदहा वाजता महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, महापौर हसिना फरास यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाच्या लोककला केंद्रात होणार आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट स्वयंसेवक, उत्कृष्ट संघ आदी पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागाच्या विस्तारित इमारतीचे भूमिपूजन आणि विद्यापीठाच्या परिसरात साकारलेल्या 'चॅन्सलर्स कोकोनट गार्डनचे डिजिटल उद्घाटन केले जाणार आहे.

10 JUN 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'आपत्ती'सह 'लेक वाचवा'चा जागर

## आव्हान-२०१७ : राष्ट्रीय शिबिराची आज होणार सांगता

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या 'आव्हान-२०१७' राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिराच्या समारोप समारंभाच्या पूर्वसंध्येला शिबिरार्थींनी कोल्हापूर शहरातून जल्लोषात फेरी काढली. त्यांनी आपत्ती व्यवस्थापनापासून ते लेक वाचवा अभियानापर्यंत विविध सामाजिक विषयांवर जनजागृती केली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते निशाण दाखवून फेरीस प्रारंभ झाला. ढोल-ताशांच्या गजरात आणि छत्रपती शिवरायांच्या जयघोषात सुरू



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित आव्हान २०१७ शिबिरातील शिबिरार्थींनी आपत्ती व्यवस्थापनविषयक काढलेली जनजागृती फेरी.

झालेल्या फेरीच्या अग्रस्थानी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे आपत्ती व्यवस्थापन सामग्रीने सुसज्ज वाहन होते. त्याबरोबर एनडीआरएफचे जवानही फेरीच्या अग्रणी होते.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. वासंती रासम, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रभारी संचालक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. पी. टी. गायकवाड, एनडीआरएफचे एस.डी. इंगळे उपस्थित होते.

### राज्यपालांची उपस्थिती

शिबिराचा समारोप समारंभ उद्या (ता. १०) कुलपती, राज्यपाल विद्यासागर राव, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, महापौर हसीना फरास यांच्या उपस्थितीत सकाळी साडे दहा वाजता होणार आहे.

# राज्यपालांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाची रंगीत तालीम

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ९ : राज्यपालांच्या सुरक्षेबाबतचा आढावा घेण्यासाठी आज पोलिस यंत्रणेने विमानतळ ते महालक्ष्मी मंदिर अशी रंगीत तालीम घेतली. जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार व पोलिस अधीक्षक संजय मोहिते यांनी याचे नेतृत्व केले.

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या आव्हान २०१७ आपत्कालीन परिस्थिती हाताळणी प्रशिक्षण शिबिराची सांगता आहे. त्यासाठी राज्यपाल विद्यासागर राव उद्या (ता. १०) कोल्हापुरात येणार आहेत. त्यांच्या सुरक्षेबाबतचा आढावा घेण्यासाठी आज अविनाश सुभेदार आणि संजय मोहिते यांनी रंगीत तालीम घेतली. सायंकाळी विमानतळ ते महालक्ष्मी मंदिरापर्यंत ही रंगीत तालीम झाली. यात अपर पोलिस अधीक्षक दिनेश बारी, शहर पोलिस उपअधीक्षक डॉ. प्रशांत अमृतकर, करवीर पोलिस उपअधीक्षक सूरज गुरव, शाहूवाडी पोलिस उपअधीक्षक आर. आर. पाटील, पोलिस निरीक्षक निशिकांत भुजबळ, तानाजी सावंत, शहर वाहतूक पोलिस निरीक्षक अशोक धुमाळ यांच्यासह पोलिस अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2017
महाराष्ट्र टाईम्स



राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत शिवाजी विद्यापीठात घेण्यात आलेल्या आव्हान या शिबिर सांगता समारंभाच्या पूर्वसंध्येला शुक्रवारी काढण्यात आलेल्या जनजागरण रॅलीत सहभागी शिबिरार्थी.

# 'आव्हान' शिबिरार्थींची रॅली

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

## राज्यपालांच्या उपस्थितीत आज विद्यापीठात सांगता

या दहा दिवसीय शिबिराचा समारोप शनिवारी (१० जून) सकाळी १०.३० वाजता महाराष्ट्राचे राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती सी. विद्यासागर राव, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, महापौर हसीना फरास यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाच्या लोककला केंद्रात होणार आहे. यावेळी कुलपतींच्या हस्ते उत्कृष्ट स्वयंसेवक, उत्कृष्ट संघ, आदी पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागाच्या विस्तारित इमारतीचे भूमिपूजन आणि विद्यापीठाच्या परिसरात साकारलेल्या 'चॅन्सलर्स कोकोनट गार्डन'चे डिजिटल उद्घाटन कुलपतींच्या हस्ते होणार आहे.

शिवाजी विद्यापीठात गेल्या दहा दिवसांपासून सुरू असलेल्या 'आव्हान-२०१७' या राष्ट्रीय सेवा योजनेच्या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिराच्या समारोप समारंभाच्या पूर्वसंध्येला शुक्रवारी शिबिरार्थींनी शहरातून जल्लोषात रॅली काढली. यावेळी आपत्ती व्यवस्थापनापासून ते सामाजिक संदेश अभियानापर्यंत विविध सामाजिक विषयांवर जनजागृती केली. शिबिराचा समारोप शनिवारी (१० जून) सकाळी १०.३० वाजता राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते होईल.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते फ्लॅग-ऑफ करून रॅलीस प्रारंभ करण्यात आला.

'आव्हान-२०१७'मध्ये राज्यभरातील चौदा विद्यापीठांतील राष्ट्रीय सेवा योजनेचे सुमारे १२०० स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. १ जूनपासून गेल्या नऊ दिवसांत भूमी, जल, आदी ठिकाणी उद्भवणाऱ्या विविध आपत्ती आणि त्यांचे व्यवस्थापन, मदतकार्य, पुनर्वसन, आदींविषयी एनडीआरएफच्या जवानांच्या सहकार्याने प्रशिक्षण देण्यात आले आहे. या कालावधीतील संपूर्ण प्रशिक्षणावर आधारित लेखी, प्रात्यक्षिक व मौखिक परीक्षाही आज सकाळी घेण्यात आली. मालती अपार्टमेंट, आईचा पुतळा व सायबरमार्गे रॅली पुन्हा विद्यापीठात सांगता करण्यात आली.

ढोलताशांच्या गजरात आणि छत्रपती शिवरायांच्या जयघोषात सुरू झालेल्या रॅलीच्या अग्रस्थानी एनडीआरएफचे आपत्ती व्यवस्थापन सामग्रीने सुसज्ज वाहन होते. त्याबरोबर एनडीआरएफचे जवानही रॅलीच्या अग्रणी होते. रॅलीत विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महाराणी ताराराणी, जिजाऊ, तानाजी मालुसरे, संत गाडगेबाबा, आदींच्या वेशभूषा केल्या होत्या. त्याचबरोबर पर्यावरण संरक्षण व संवर्धन, स्त्री-भ्रूणहत्याविरोधी बेटी बचाओ अभियान, वृक्षसंवर्धन, महिला सन्मान, ग्लोबल वॉर्मिंग, मतदार जागृती, शेतकरी आत्महत्या, लष्करी जवानांचा सन्मान अशा अनेक विषयांबाबत प्रबोधन करणारे फलक घेऊन स्वयंसेवक रॅलीत सहभागी झाले होते.

10 JUN 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

नसीर अत्तार



शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) 'आव्हान' आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरांतर्गत जागृती फेरी काढण्यात आली. यात शिवाजी विद्यापीठाच्या संघातील 'एनएसएस'चे स्वयंसेवक शाहू महाराज, शिवराय आणि मावळ्यांच्या वेशभूषेत सहभागी झाले होते.



एका स्वयंसेवकाने कडकलक्ष्मीच्या माध्यमातून 'शेतकरी वाचवा'ची साद दिली.



एक स्वयंसेवक साईबाबा यांच्या वेशभूषेत सहभागी झाला होता.

## 'पाणी वाचवा, पर्यावरण वाचवा'चा दिला संदेश : शिवाजी विद्यापीठातील 'आव्हान' शिबिराचा आज समारोप

# जागृती फेरीतून तरुणाईकडून समाजप्रबोधन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : 'पाणी वाचवा, देश वाचवा', 'लेक वाचवा'ची साद, व्यसनाचे दुष्परिणामाचे देखावे, आपत्ती व्यवस्थापनाची प्रात्यक्षिके, पारंपरिक वाद्यांचा गजर अशा उत्साही वातावरणात जागृतीफेरीतून तरुणाईने शुक्रवारी समाजप्रबोधनाचा नारा दिला. शिवाजी विद्यापीठातील 'आव्हान' या राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरांतर्गत काढण्यात आलेल्या या फेरीत सुमारे १२०० तरुण-तरुणी उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्या होत्या.

गेल्या नऊ दिवसांपासून सुरू असलेल्या 'आव्हान'चा समारोप आज, शनिवारी सकाळी सव्वा अकरा वाजता राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यावेळी पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, शाहू छत्रपती, महापौर हसिना फरास उपस्थित असणार आहेत. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीपासून जागृती फेरीला कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ध्वज दाखवून सुरुवात झाली. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, वासंती रासम, पी. डी. राऊत, ए. एम. गुरव, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, 'एनएसएस'चे प्रभारी संचालक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, 'एनडीआरएफ'चे एस. डी. इंगळे आदी उपस्थित होते. जागृती फेरीच्या अग्रभागी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) पथक होते. त्यानंतर फलटण येथील श्रीमंत शिवाजीराजे नाईक-निंबाळकर झांजपथक होते. यापाठोपाठ शिबिरातील सहभागी विद्यापीठांचे जिल्हानिहाय संघ सहभागी होते. मुंबई विद्यापीठाने आपत्तीमधील सुरक्षा, दहशतवाद थांबवा, स्त्री-पुरुष समानता, कॅशलेस व्यवस्था आदींबाबत प्रबोधन केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने वृक्षदिंडीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने 'पाणी, पर्यावरण वाचवा'चा संदेश दिला. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील स्वयंसेवकांनी व्यसनमुक्ती, प्रदूषण रोखण्याबाबत प्रबोधन केले. राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाने स्त्री सबलीकरण, अवयव दानाचा नारा दिला. नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाने लेझीम पथकाच्या गजरात वृक्षसंवर्धनाची हाक दिली. नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने पर्यावरण रक्षण, तर सोलापूर विद्यापीठाने 'पाणी वाचवा, देश वाचवा'चा संदेश दिला. नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे आरोग्य पथक सहभागी झाले होते. विद्यापीठाचे प्रवेशद्वार क्रमांक आठ, मालती अपार्टमेंट, गोखले विद्यालय, सायबर चौक, विद्यापीठाचे प्रवेशद्वार क्रमांक सहामार्गे आलेल्या फेरीचा समारोप मुख्य इमारतीजवळ झाला.

## रिमझिम पावसातही उत्साह

'आव्हान'मध्ये राज्यातील १४ विद्यापीठांतील जिल्हानिहाय संघ सहभागी झाले आहेत. त्यांनी जागृती फेरीमध्ये आपला जिल्हा, शहराच्या संस्कृतीचे दर्शन घडविले. यात गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाने पारंपरिक आदिवासी नृत्य साद्‌र केले. पारंपरिक वेशभूषा, डोक्यावर भगवे फेटे परिधान करून अनेक स्वयंसेवक सहभागी झाले होते. काही स्वयंसेवकांनी साईबाबा, वासुदेव, कडकलक्ष्मी अशी वेशभूषा केली. प्रबोधनपर संदेशाचे फलक अनेक स्वयंसेवकांच्या हातात होते. रिमझिम पावसामध्येही फेरीतील तरुणाईचा उत्साह कायम होता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2017
महाराष्ट्र टाईम्स

## राज्यपाल राव आज कोल्हापुरात



कोल्हापूर : महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव शनिवारी (१० जून) कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या आव्हान-२०१७ च्या समारोप कार्यक्रमास ते उपस्थित राहणार आहेत. सकाळी नऊ वाजून ५० मिनिटांनी त्यांचे मुंबईहून कोल्हापूर विमानतळावर आगमन होईल. त्यानंतर मोटारीने अंबाबाई मंदिर येथे अंबाबाईचे दर्शन घेऊन राज्यपाल राव शिवाजी विद्यापीठाकडे रवाना होतील. सकाळी अकरा वाजून १५ मिनिटांनी ते विद्यापीठात कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. दुपारी साडेबारा ते दीड या वेळेत त्यांचा वेळ राखीव आहे. दुपारी पावणे दोनच्या सुमारास ते विमानाने मुंबईकडे रावाना होतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUN 2017
पुण्यनगरी

# राज्यपाल सी. विद्यासागर राव आज कोल्हापुरात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**



महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव हे शनिवारी कोल्हापूर दौऱ्यावर येत येत आहेत. शिवाजी विद्यापीठ येथे आयोजित 'आव्हान २०१७' समारोप कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

त्यांचा सविस्तर दौरा असा, शनिवार, दि. १० रोजी सकाळी ९.५० वाजता मुंबई येथून विमानाने कोल्हापूर विमानतळ येथे आगमन, ९.५५ वाजता मोटारीने अंबाबाई मंदिराकडे प्रयाण, १०.२० वाजता देवीचे दर्शन, १०.५० वाजता मंदिर येथून मोटारीने शिवाजी विद्यापीठाकडे प्रयाण, ११.१५ वाजता 'आव्हान २०१७' समारोप कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित, दुपारी १२.३० ते १.३० वाजेपर्यंत राखीव, १.३० वाजता मोटारीने कोल्हापूर विमानतळाकडे प्रयाण.

11 JUN 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आपत्तीविषयक जागृतीसाठी युवकांनी प्रयत्न करावेत

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे आवाहन; 'आव्हान-२०१७'चा समारोप

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नदीकाठालाघरेबांधूनउंचटोलेजंग इमारती उभारून आपण विकासाच्या नावाखाली नव-नवीन आपत्ती निर्माण करीत आहोत. लोकसंख्या वाढ व नदी, नाले मुजविल्याने गावा-गावांतील आपत्तीत वाढ झाली आहे. 'आव्हान' प्रशिक्षणांतर्गत प्रशिक्षित झालेल्या युवकांनी आपापल्या जिल्ह्यांतील गावागावांतून, शाळा-महाविद्यालयांतून आपत्ती व्यवस्थापनविषयक जागृतीसाठी कार्यरत राहावे, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या 'आव्हान-२०१७' या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी शाहू महाराज छत्रपती, महापौर हसिना फरास, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल खेमणार, महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित चौधरी, राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) निरीक्षक एस.डी. इंगळे उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले, दुर्घटना होऊ नये, यासाठी दक्षता बाळगणे हा आपत्ती व्यवस्थापनाचा महत्त्वाचा भाग आहे. आपद्ग्रस्तांच्या मदतीसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ असणे महत्त्वाचे आहे. 'आव्हान' हा कुलपती कार्यालयाचा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. या चॅन्सलर्स ब्रिगेडच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांला आता आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भात प्रशिक्षित मनुष्यबळ मिळणार आहे. या विद्यार्थ्यांनी आपल्या प्रशिक्षणाचा उपयोग परिसरातील अन्य युवकांना करून द्यायला हवा.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील 'आव्हान-२०१७' या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराच्या समारोप समारंभात बोलताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील. डॉ. कुणाल खेमनार, प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे, महापौर हसिना फरास, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, शाहू महाराज छत्रपती, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, डॉ. डी. टी. शिर्के, आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, डॉ. विलास नांदवडेकर आदी. (छाया : पप्पू आतार)

### 'आव्हान'मध्ये पुणे, सातारा जिल्हा सर्वोत्कृष्ट

'आव्हान-२०१७'मध्ये प्रशिक्षणात पुणे व सातारा जिल्ह्याचे संघ अनुक्रमे सर्वोत्कृष्ट ठरले. त्यांना 'बेस्ट कॉन्टिन्जेन्ट' फिरता चषक प्रदान करण्यात आला. 'बेस्ट कॉन्टिन्जेन्ट लिडर' साठीचा फिरता चषक नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे प्रा. अतुल अकोठोर व पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रा. सारिका पेरणे यांना देण्यात आला. 'बेस्ट एनएसएस व्हॉलंटिअर'साठीचा फिरता चषक चौघांना देण्यात आला. यामध्ये महेश गणेश बन (महाराष्ट्रआरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक), कुणाल मानकर (उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव), हर्षा सुनील भट्ट (महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक) आणि सामिका सावंत (बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ, दापोली) यांचा समावेश आहे. जनजागृती फेरीमधील सर्वोत्कृष्ट सहभागासाठीचा फिरता चषक मुंबई विद्यापीठाने पटकाविला.

यावेळी मंत्री पाटील यांनी देशाच्या आपत्ती व्यवस्थापनात अत्यंत मोलाचे योगदान देणाऱ्या एन.डी.आर.एफ.च्या जवानांचीही प्रशंसा केली.

जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार म्हणाले, आपत्ती व्यवस्थापनात तत्काळ मदत, त्यानंतर निवारा व अन्य मदत आणि त्यानंतर पुनर्वसन हे तीन घटक महत्त्वाचे असतात. यापैकी तत्काळ मदत देण्यात आपण कमी पडतो. जिल्हा आपत्ती व्यवस्थापनांतर्गत १२९ गावांत पूरस्थिती येण्याची शक्यता लक्षात घेऊन स्थानिक २५ ते ५० वयोगटांतील नागरिकांना प्रशिक्षण देण्याचा उपक्रम जिल्हा प्रशासनाने हाती घेतला आहे. त्यापैकी ५० गावांतील नागरिकांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्याचेही त्यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी भाषणात आपत्तीप्रसंगी विद्यापीठ परिक्षेत्रात राष्ट्रीय सेवा योजनेतून दिलेल्या योगदानाविषयी माहिती दिली. वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या 'माध्यमविद्या' या विशेषांकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन झाले. शुक्रवारी शहरातून काढलेल्या जागृती फेरीदरम्यान सोलापूर विद्यापीठाची स्वयंसेवक विद्या कदम हिने आपत्ती निधी गोळा केला. कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र वडजे यांनी तो जिल्हाधिकारी सुभेदार यांच्याकडे सुपूर्द केला.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या शुभेच्छा संदेशाचे वाचन केले. डॉ. डी. के. गायकवाड यांनी 'आव्हान-२०१७' चे अहवाल वाचन केले. डॉ. तृप्ती करेकट्टी आणि नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

### विद्यार्थ्यांनी राष्ट्राला मदतीसाठी तत्पर असावे

राज्यपाल सी. विद्यासागर राव काही अपरिहार्य कारणामुळे आजच्या समारोप समारंभाला उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांनी शिबिरार्थींना विशेष शुभसंदेश पाठवून प्रोत्साहित केले. शिबिराचे यजमानपद यशस्वीरीत्या भूषविल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे अभिनंदन केले. चॅन्सलर्स ब्रिगेडच्या भेटीसाठी उपस्थित राहू न शकल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली आहे. आव्हान व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्राला त्यांच्या सेवेची गरज भासेल, तेव्हा ती बजावण्यासाठी तत्पर असावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.